दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २०० ●रविवार, दि.१९ ऑक्टोबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955

# जीआरचा फुगा फुटतोय, मराठा समाजाचा उद्रेक पुन्हा होतोय! विखे पाटलांना घेराव



छ.संभाजीनगर । प्रतिनिधी

●मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर आंदोलकांनी जीआर फसवा असल्याचा आरोप करत घेराव घातला. आंदोलकांनी सरकारवर विश्वासघाताचा आरोप करत आरक्षणाच्या अंमलबजावणीबाबत तात्काळ कारवाईची मागणी केली. या घटनेनंतर महाराष्ट्रातील मराठा आरक्षणाचा वाद पुन्हा एकदा तापला असून राजकीय वातावरण चांगलेच गरम झाले आहे.

मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष असलेले महायुती सरकारम धील मंत्री राधाकृष्ण विखे पाटील सध्या ओबीसी आणि मराठा अशा दोन्ही समाजाच्या टीकेचे धनी ठरत आहेत. हेदराबाद गॅझेट लागू करण्याचा निर्णय, नोंदीनूसार कुणबी समाजाचे प्रमाणपत्र आणि ओबीसींचे आरक्षण मराठा सम ाजाता लागू केल्याने विखे यांचे कौतुक झाले. सरकारकडून विखे पाटील यांनी महत्वाची भूमिका बजावली. जीआर लागू केल्यामुळे ओबीसींच्या निशाण्यावर असलेले विखे आता मराठा समाजाकडूनही टार्गेट केले जात आहे.

हेदराबाद गॅझेट लागू करण्याचा जीआर फसवा आहे. मराठा समाजाची फसवणूक करणारा असल्याची टीका काही अभ्यासक आणि मराठा नेत्यांनी सुरवातीपासून केली. या जीआरवरून मराठा समाजामध्येच मतभेद असल्याचे मध्यंतरीच्या काळात दिसून आले. दरम्यान, शासनाचा जीआर योग्य आणि पक्का असल्याचे राधाकृष्ण विखे पाटील यांनी वारंवार सांगीतले. मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांचीही नुकतीच विखे पाटील यांनी अंतरवालीत जाऊन भेट घेत दीड तास चर्चा केली. त्यानंतर छत्रपती संभाजीनगरमध्ये मराठा आंदोलकांनी विखे यांना घेराव घालत जीआर फसवा आहे का? असा सवाल केला.

विखे पाटील यांना घेराव घातल्यानंतर हैदराबाद गॅझेट लागू करण्यासाठीचा जीआर आणि त्याचा फुगा आता फुटतोय अशी चर्चा सुरू झाली आहे. यातून सत्ताधारी विशेषतः राधाकृष्ण विखे पाटील यांच्याबद्दल मराठा समाजातील एक मोठा वर्ग उघडपणे नाराजी व्यक्त करताना दिसत आहे. मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यासंदर्भात राज्य सरकारने २ सप्टेंबरला हैदराबाद गॅझेट लागू केले. या जीआरमधून काय मि ळाले? तो फसवा आहे का ? असा प्रश्न पैठण तालुक्यातील मराठा

▶▶ उर्वरित पान २ वर

## आरक्षण रद्द होण्याच्या भीतीने मराठा युवकाची आत्महत्या; बीडमध्ये खळबळ

बीड । प्रतिनिधी



मराठा समाजाला मि ळालेले कुणबी आरक्षण रद्द होईल की काय, या भीतीने बीड तालुक्यातील वरवटी येथील एका २३ वर्षीय युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना काल (दि. १७) दुपारी ५ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. विष्णु (शाम) परमेश्वर कोटुळे असे आत्महत्या केलेल्या युवकाचे नाव आहे. मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देऊन शासनाने दिलेल्या आरक्षणावर नुकत्याच झालेल्या ओबीसींच्या मेळाव्यातून प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. याच नैराश्यातून विष्णु कोटुळे याने टोकाचे पाऊल उचलल्याचे समोर आले आहे.

वरवटी येथील रहिवासी असलेला विष्णु (शाम) परमेश्वर कोटुळे (वय २३) या युवकाने काल दुपारी ५ वाजेच्या सुमारास घरात गळफास लावून घेतला. मराठा समाजाला 'हैदराबाद गॅझेट'नुसार मिळालेले कुणबी आरक्षण रद्द होईल की काय, तसेच बीड येथील नुकत्याच झालेल्या ओबीसींच्या मेळाव्यामुळे आरक्षणावर विपरीत परिणाम होईल, या चिंतेतून त्याने हे पाऊल उचलल्याची माहिती मिळाली आहे. विष्णु कोटुळेच्या खिशात पोलिसांना एक चिठ्ठी मि ळाली ▶▶ उर्वरित पान २ वर

## 'येडेश्वरी' मुळे शेतकरी आनंदी असल्याचे पाहून समाधान वाटते

### खा.बजरंग सोनवणे यांचे प्रतिपादन, येडेश्वरी कारखान्याचे बॉयलर अग्निप्रदीपन

बीड । प्रतिनिधी




पुर्वी ऊसउत्पादकांना आपला ऊस घेवून जाण्यासाठी कारखानदारांकडे चकरा माराव्या लागत. हे बंद करण्यासाठी शेतकरी केंद्रबिंदू माणून आपण येडेश्वरी साखर कारखान्याच्या उभारणीचा निर्णय घेतला. यानंतर हा कारखाना हळूहळू मोठा केला. आज या कारखान्यामुळे शेतकऱ्यांना आपला ऊस घेवून जाण्यासाठी कुठेही जावे लागत नाही, आणि ऊसदरही अपेक्षित मिळत आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसतो, हाच आनंद पाहून आपल्याला समाधानी वाटते, असे प्रतिपादन खा.बजरंग सोनवणे यांनी केले. येडेश्वरी साखर कारखाना लि.आनंदगाव सा.युनिट नं.१ चा १२ वा बॉयलर अग्निप्रदीपन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी मान्यवरांच्या उपस्थितीत बॉयलर अग्निप्रदीपन करण्यात आले. यावेळी पुढे बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, म ागच्या काही वर्षांपुर्वी शेतकऱ्यांना कारखान्याची गरज होती. आता कारखान्याला शेतकऱ्यांची गरज आहे. साखर कारखाना हा तीन चाकी रिक्षा आहे. यातील एक चाक म्हणजे ऊसउत्पादक, दुसरे चाक ऊसतोड मजूर आहे तर तिसरे चाक हे कारखान्यातील कर्मचारी

▶▶ उर्वरित पान २ वर

## छातीत गोळी लागून तरुणाचा जागीच मृत्यू

### आष्टी तालुक्यातील घटना

कडा । प्रतिनिधी




आष्टी तालुक्यात धक्कादायक घटना घडली असून एका युवकाला छातीत गोळी लागून त्याचा मृत्यू झाला. त्याच्यावर अज्ञात व्यक्तींनी गोळीबार केला की त्याने स्वतःवर गोळी झाडून घेतली. याबाबत संदिग्धता आहे. घटनेनंतर परिसरात प्रचंड भीतीचे वातावरण पसरले आहे. आष्टी तालुक्यातील अंभोरा-हिवरा रस्त्यावर एका तरुणाचा मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली आहे. या तरुणाच्या छातीत गोळी झाडल्याचे प्राथमिक दृष्ट्या दिसत आहे, तर मृतदेहाजवळच एक दुचाकी आणि विनापरवाना पिस्तूल आढळून आले आहे. ही खळबळजनक घटना शनिवारी अंभोरा पोलीस ठाणे हद्दीत समोर आली. आष्टी तालुक्यातील वाघळुज येथील मयूर उर्फ बाळा रामदास चव्हाण (वय ३५) याचा मृतदेह अंभोरा-हिवरा रस्त्यावरील कच्च्या रस्त्यालगत सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास येणाऱ्या- जाणाऱ्या लोकांना दिसला. नागरिकांनी तात्काळ

▶▶ उर्वरित पान २ वर

## सत्ताधाऱ्यांमध्येच जुंपली; धनंजय मुंडेंनी जीवनात कोणाशी निष्ठा ठेवली? सत्ताधारी आमदार प्रकाश सोळंकेंचा सवाल

मुंबई । प्रतिनिधी



धनंजय मुंडेंनी निष्ठेच्या गप्पा मारू नये, त्यांची पक्षनिष्ठा मला माहिती आहे. असे विधान अजित पवार गटाचे आमदार प्रकाश सोळंके यांनी केले आहे. तसेच विधानसभा निवडणुकीत माझ्या विरोधात दोन ओबीसीचे उमेदवार उभे केले होते. गेवराई आणि आष्टीत सुद्धा त्यांची पक्षनिष्ठा जगजाहिर आहे. जीवनात त्यांनी कोणाशी निष्ठा ठेवली हे एकदा सांगावे असे म्हणत सोळंके यांनी धनंजय मुंडेंवर हल्लाबोल केला आहे.

काल बीडमध्ये ओबीसीच महाएल्गार मेळावा आयोजित करण्यात आला होता. या म ेळाव्यात आमदार धनंजय मुंडे यांनी आमदार प्रकाश सोळंके यांना निवडून आणण्यासाठी मदत केल्याचे म्हटले होते. त्यावर उत्तर देताना त्यांच्याच गटाचे आमदार प्रकाश सोळंके यांनी धनंजय मुंडेंवर सडकून टीका केली. माध्यमांशी बोलताना प्रकाश सोळंके म्हणाले की, धनंजय मुंडेंनी कोणाला मदत केली सांगायची गरज नाही. धनंजय मुंडेंना राजकारणात कोणी आणलंय हे त्यांनी सांगावं, फार मोठे झाल्यासारखं त्यांना वाटत असेल त्यांनी जमिनीवर पाय ठेवून बोलावं आणि पक्षनिष्ठाच्या गप्पा तर त्यांनी मारूच नये. त्यांची पक्षनिष्ठा किती आहे हे मला माहित आहे. कारण माझ्या विरोधातच एकाच पक्षाचे असताना दोन ओबीसीचे उमेदवार उभे केले होते. गेवराई मतदार संघातही विजयसिंह पंडितांच्या विरोधात आणि आष्टी मतदारसंघात सुरेश धस

▶▶ उर्वरित पान २ वर

## बीड शहरातील बहुसंख्य हिंदू - मुस्लिम महिलांचा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश

### बीड जिल्ह्याला गत वैभव प्राप्त करून देऊ: अंबादास दानवे

बीड । प्रतिनिधी



दिनांक १८ ऑक्टोबर रोजी दुपारी चार वाजता महाराष्ट्र राज्याचे माजी विरोधी पक्षनेते तथा शिवसेना नेते अंबादासजी दानवे साहेब यांच्या नेतृत्वाखाली व शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर यांच्या पुढाकाराने, तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंगन, युवा नेते बिलाल भाई, यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड शहरातील राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी युवती जिल्हा सचिव नुजहत सिद्दिकी,महिला अल्पसंख्याक शहराचे अध्यक्ष शेख यास्मिन वाहेद, अश्विनी बप्पासाहेब गायके, दीपा दिने जाधव, ▶▶ उर्वरित पान २ वर

## बाजीराव रस्त्यावर व्यापाऱ्याला अडवून 1.30 लाख लुटून नेले दिवाळीच्या काळात व्यापाऱ्याला लुटण्याची ही दुसरी घटना

पुणे । प्रतिनिधी

बाजीराव रस्त्यावर एका व्यावसायिकाला धमकावून १ लाख ३० हजार रुपयांची रोकड लुटण्यात आली आहे. दुचाकीस्वार चोरट्यांनी ही घटना घडवून आणली असून, याप्रकरणी खडक पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याबाबत ६० वर्षीय व्यावसायिकाने खडक पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.. त्यांचे सदाशिव पेठेतील कुमठेकर रस्त्यावर ▶▶ उर्वरित पान २ वर












# दीपावली : ज्ञानाच्या प्रकाशातून अज्ञानाच्या अंधाराचे दहन



अज्ञानाचा अंधार नाहीसा करून मानवी जीवनात ज्ञानाचा प्रकाश उजळवणारा दिवाळीचा सण. सोनपावलांनी येणाऱ्या दिवाळीच्या प्रत्येक दिवसाला आध्यात्मिक–सांस्कृतिक महत्त्व आहे. त्याविषयी....

दीपावली म्हणजे स्नेहाच्या प्रेमाच्या प्रकाशाची उधळण होय. दिवाळी – दीपोत्सव म्हणजे खऱ्या अर्थाने आनंदाचा प्रकाशाचा सण आहे. वास्तवात हा उत्सव समृद्धी देणारा सण आहे. वर्षभरातल्या चिंता, भय, ताणतणाव, महामारी यांची मरगळ झटकून टाकत नव्या उमेदीने जीवनाला सुखमय – आनंदमय करणारा हा सण आहे. अज्ञानाचा अंधार नाहीसा करून मानवी जीवनात ज्ञानाचा प्रकाश फैलवणारा हा सण आहे.

सोनपावलांनी येणाऱ्या दिवाळीच्या प्रत्येक दिवसाला आध्यात्मिक–सांस्कृतिक महत्त्व आहे. धनत्रयोदशीपासून ते भाऊबीजेपर्यंत प्रत्येक क्षण–क्षण हर्षोल्हासात साजरा केला जातो. तथापि दीपावलीचा शुभारंभ हा खऱ्या अर्थाने 'वसुबारस' पासून म्हणजेच दि. २१ ऑक्टोबरपासून होत असून, सायंकाळी गाय–वासराची पूजा करून त्यांना नेवैद्य खाऊ घातला जातो. त्यानंतर 'धनत्रयोदशी'ला म्हणजेच दि. २२ ऑक्टोबर रोजी मुहूर्तानुसार देवापुढे धनधान्य व धने ठेवून त्याची पूजा कर अन् सायंकाळी दक्षिण दिशेला कणकेचे दिवे लावून त्यांची पूजा केली जाते.

'नरक चतुर्दशी'च्या दिवशी म्हणजेच या वर्षी दि. २४ ऑक्टोबर रोजी घरातील सर्व लहान–मोठे सदस्य पहाटे अभ्यंगस्नान करतात अन् त्यानंतर अंगणात फटाके फोडतात. आख्यायिकेत याच दिवशी भगवान श्रीकृष्णाने नरकासुर राक्षसाचा वध केला होता. महत्त्वाचे म्हणजे, याच दिवशी दि. २४ ऑक्टोबर रोजीच 'लक्ष्मीपूजन' देखील असून वद्य अमावस्येला सायंकाळी लक्ष्मी–कुबेराचे पूजन केले जाते. धनधान्य समृद्धी व सौख्य नांदावे हे त्याचे प्रतीक असते. त्यानंतर कार्तिक शुद्ध प्रतिपदा म्हणजेच बलिप्रतिपदा. ज्यास आपण 'दीपावली पाडवा' असेही म्हणतो. हा दिवस साडेतीन मुहूर्तांपैकी एक असून या दिवशी कोणत्याही शुभकार्याची सुरुवात केली जाते. या शुभदिनी पत्नी ही पतीला ओवाळून त्याच्यासाठी दीर्घायुष्य चिंतिते. तिला याप्रसंगी तिच्या आवडीची साडी भेट म्हणून दिली जाते. योगायोगाने या वर्षी याच दिवशी 'भाऊबीज' देखील असून, बहीण आपल्या भाऊरायाला ओवाळून पेढा भरवते अन् त्याच्या उज्ज्वल भवितव्यासाठी देवाला प्रार्थना करते. भाऊसुद्धा बहिणीला तिच्या आवडीची भेटवस्तू देतो. दागदागिन्यांची खरेदीही मोठ्या प्रमाणात केली जाते. वास्तवात हा सण म्हणजे आनंदाची पर्वणीच!

दीपावलीच्या चार–पाच दिवसांच्या काळात घरोघरी रोषणाई केली जाते. तसेच घरांच्या ओट्यावर गॅलरीत मातीच्या पणत्या लावून सभोवतालचा परिसर प्रकाशमय केला जातो. वास्तवात हा दिव्यांचा रोषणाईचा सण आहे. आपल्या आया–भगिनी अंगणात आकर्षक रांगोळ्या काढून सर्वांचे लक्ष वेधित असतात. रंगबेरंगी आकाश कंदिलांची उभारणी, नातेवाईक– मित्रमंडळीला फराळाची मेजवानी अन् फटाक्यांची आतषबाजीमुळे तर सारा परिसर दुमदुमून जातो. प्रत्येक जण पारंपरिक वेशभूषा करून इतरांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करत असतो. चमचमीत फराळावर ताव मारून दिवाळीचा आनंद लुटण्याची मजा काही औरच असते. याशिवाय नातेवाईकांना आप्तमित्रांना दिवाळीनिमित्त दिल्या जाणाऱ्या शुभेच्छांना तर पारावारच उरत नाही. 'ग्रीटिंग कार्ड' देऊन वा मोबाईलद्वारे मेसेज पाठवूनही दीपावलीच्या शुभेच्छा व्यक्त केल्या जातात. येनकेनप्रकारे आपल्या मित्रांना, सगेसोयऱ्यांना आपल्या दीपावली शुभेच्छा पोहोचविण्याचा हा सर्वंकष प्रयत्न असतो, हे दृष्टोत्पत्तीस येते.

काळ कितीही बदलो, पण आगरी–कोळी समाजाची दिवाळी पारंपरिक पद्धतीने मोठ्या धूमधडाक्यात दरवर्षी साजरी होत असते. त्यांचं आपल्या पारंपरिक संस्कृतीशी घट्ट नातं आहे. मुंबई, ठाणे, कोकणातील भूमिपुत्रांची दिवाळी साजरी करण्याची पद्धत काही आगळीवेगळीच असते. बलिप्रतिपदेला हे लोक पारंपरिक पद्धतीने बैलांची मनोभावे पूजा करत असतात. आपल्या शेतीत भरपूर उत्पन्न निघो, धनधान्याची भरभराट होवो, या पार्श्वभूमीवर आगरी–कोळी लोक 'ईडा पीडा टळो, बळीचे राज्य येवो' असे देवाला साकडे घालत भाताच्या पेंढ्या आपापल्या घरासमोर जाळत असतात. तसेच लक्ष्मीपूजनच्या दिवशी हे लोक रात्रीच्या वेळी तांदळाच्या पीठाची बैलाची प्रतिकृती तयार करून गावभर मिरवतात. अशा भव्यदिव्य पद्धतीने आगरी–कोळी समाज आपली दिवाळी साजरी करत असतात. त्यांना आमच्यातर्फे दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!



दीपावली हा पारंपरिक भारतीय सण मतभेद–मनभेद विसरून तुम्ही आम्ही सर्वजण आपली हजारो वर्षांपूर्वीची संस्कृती, परंपरा अधिकाधिक समृद्ध करण्याचा प्रयत्न करत असतो. खरंतर दीपावली हा सण आता धर्ममर्यादा ओलांडून त्याने एक राष्ट्रीय उत्सवाचे स्वरूप प्राप्त केले आहे, ही अभिमानाची गोष्ट आहे. यातूनच खऱ्या अर्थाने धार्मिक सहिष्णुता प्रस्थापित होऊन 'सर्वधर्मसमभाव' निर्माण होण्यास चालना मिळते. समस्त युवक–युवतींचे भवितव्य उज्ज्वल होवो, तर ज्येष्ठांना निरोगी स्वास्थ्य लाभो, याच दीपावलीनिमित्त अनंत शुभेच्छा ! मित्रहो, आपणा सर्वांना यंदाची दीपावली सुखा–समाधानाची, आनंदाची व भरभराटीची जावो, ही ईश्वर चरणी प्रार्थना!

◆ पान १ वरून पुढे...

## जीआरचा फुगा...

आंदोलकांनी विखे यांना केला. कार्यकर्त्यांनी विखे यांना धारेवर धरत जीआर जारी होऊन दीड महिना झाला. पण, अद्याप एकही कुणबी प्रमाणपत्र का निघाले नाही? आजवर राज्यभरातील एकाही गावात जीआरनुसार ग्रामस्तरीय समितीची स्थापना का झाली नाही?' असा थेट सवाल केला. त्यावर विखे यांनी ग्रामस्तरीय समिती स्थापन झाली नसल्याचे मान्य केले. यंत्रणेत आपल्याला त्रुटी दिसत आहेत, असे असले तरी गैरसमज करून घेऊ नका. जीआरची निश्चित अंमलबजावणी होईल, असे आश्वासन त्यांनी आंदोलकांना दिले. ग्रामस्तरीय समितीबाबत शुक्रवारी छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्तांसह तीन जिल्हाधिकाऱ्यांची बैठक बोलावण्यात आली होती. इतर जिल्हाधिकारीही ऑनलाइन बेठकीत सहभागी झाले. जीआरनुसार प्रशासनाने काय पावले उचलली याचा आढावा घेतला. एकीकडे सरकार म्हणून आम्ही आरक्षणासाठी भूमिका घेत आहोत, तर दुसरीकडे प्रशासन जर ढिम्म असेल तर जनतेसमोर आम्हाला जावे लागत आहे. असे अधिकाऱ्यांना सांगितले, अशी माहिती विखे यांनी यावेळी दिली. एकूणच विखे पाटील याची दोन्ही बाजूने कोंडी होत असल्याचे चित्र आहे.

## आरक्षण रद्द होण्याच्या ....

आहे. त्यामध्ये त्याने आत्महत्या करण्याचे स्पष्ट कारण नमूद केले आहे. चिठ्ठीत त्याने लिहिले आहे की, मराठा समाजाला कुणबी म्हणून शासनाने काही दिवसापूर्वी जीआर काढला होता, परंतु काल बीडला झालेल्या ओबीसीच्या महायलगार मेळाव्यामुळे मराठा समाजाला दिलेला जीआर (आरक्षण) रद्द होणार व पुन्हा आम्हाला नोकरी मिळणार नाही या नैराश्यातून मी आज आत्महत्या करत आहे. पुढे त्याने आपल्या समाजासाठी अत्यंत कळकळीची मागणी केली आहे. तो म्हणतो, माझा मराठा समाज खूप गरीब आहे, मराठा समाजाला दिलेले आरक्षण टिकले नाही तर माझ्यासारखे अनेक मराठा बांधव आत्महत्या करतील. आरक्षण टिकणार की नाही या भीतीने एका तरुण मराठा युवकाने आपले जीवन संपवल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या घटनेने बीड जिल्ह्यात खळबळ उडाली असून आरक्षणाच्या मुद्द्यावरून समाजात निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीचे दर्शन घडवले आहे. या घटनेबाबत अधिक तपास पोलीस करत आहेत.

## 'येडेश्वरी' मुळे...

आहेत. यातील एक चाक जरी रस्त्यावरून घसरले तर जिल्ह्यात

◆ पान १ वरून पुढे...

अनेक कारखान्याचे काय झाले?, हे आपण पाहत आहोत. कारखानदारी आता सोपी राहिलेली नाही. कारखाना चालविताना समन्वय असणे आवश्यक आहे. आपण शेतकरी केंद्रबिंदू मानून कारखान्याची उभारणी केली. त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलावे, त्यांचे प्रपंच उभा रहावे, असा उद्देश कारखाना उभारणी करताना ठेवलेला आहे. उसउत्पादक, ऊसतोड मजूर यांना जपण्याचे काम केले आहेच पण कारखान्यातील कर्मचाऱ्यांना देखील कधीही नाराज केलेले नाही. या वर्षी त्यांच्यासाठी चांगली वेतन वाढ करण्यात आलेली आहे. यामुळे कर्मचारी खूष आहेत. हा कारखाना दरवर्षीपेक्षा यावेळी अधिक उस गाळप करण्याचा प्रयत्न करेल. शेतकऱ्यांचा संपूर्ण ऊस घेवून जाण्यासाठी प्रयत्न करेल. आपला कारखाना अडीच हजार टनवरून आठ हजार कॅप्पीसीटीपर्यंत गेला आहे. कारखान्याच्या माध्यमातून अनेक प्रकल्प तयार केले आहेत. यातून लोकांच्या हाताला रोजगार मिळाला आहे. यावर्षी उत्तम पध्दतीने कारखाना चालवला जाईल. आपण सर्वांनी हा कारखाना आपला आहे, असे समजूनच काम करावे, असे अवाहनही त्यांनी यावेळी कर्मचाऱ्यांना केले. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या उप प्रदेशाध्यक्षा संगीता ठोंबरे, मा.आ.पृथ्वीराज साठे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे पदवीधर संघाचे प्रदेशाध्यक्ष डॉ.नरेंद्र काळे, येडेश्वरी साखर कारखान्याचे संचालक बाळकृष्ण भवर, सारिका बजरंग सोनवणे, सौरव सोनवणे यांच्यासह पंचक्रोशीतील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन, व्हा.चेअरमन, संचालक, कार्यकर्ते, येडेश्वरी साखर कारखान्याचे संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## छातीत गोळी...

पोलिसांना घटनेची माहिती दिली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली. रस्त्याच्या कडेला लावलेली एक दुचाकी, छातीत गोळी लागल्याची जखम आणि मृतदेहाजवळ पडलेले पिस्तूल पोलिसांना आढळून आले. मयूर चव्हाण हा मिस्त्री काम करत होता. त्याच्याजवळ विनापरवाना पिस्तूल आले कुठून,कोणी अज्ञात कारणांसाठी गोड बोलून निर्मनुष्य जागेवर त्याची हत्या केली की त्याने आत्महत्या केली,याबाबतचे गुढ अद्याप कायम आहे. घात की आत्महत्या पोलिसांकडून कसून तपास–या घटनेमागे घातपात असण्याची शक्यता वर्तवली जात असून, परिसरात याबाबत जोरदार चर्चा सुरू आहे. घटनास्थळी आष्टीचे उपअधीक्षक बाळकृष्ण हनपुडे, अंभोरा ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे, पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत

◆ पान १ वरून पुढे...

तावरे, आदिनाथ भडके यांच्यासह पोलीस हवालदार बाबासाहेब गर्जे, पोलीस अंमलदार शिवदास केदार, अमोल ढवळे आणि अन्य पोलीस कर्मचारी उपस्थित होते. पोलीस या प्रकरणाचा कसून तपास करत आहेत.

## सत्ताधाऱ्यांमध्येच जुंपली...

यांच्याविरोधात ओबीसी उमेदवार उभे करण्यात आले होते. त्यांचीही पक्षनिष्ठा जगजाहिर आहे. त्यांनी पक्षनिष्ठेच्या गप्पा मारू नयेत, जीवनात कोणाशी निष्ठा ठेवली हेच त्यांनी सांगावे असे सोळंकी म्हणाले. तसेच आमच्यावर बोलताना त्यांनी सांभाळून बोलावे कारण मी पाच वेळा आमदार झालोय, विजयसिंह पंडित सुद्धा त्यांच्या वडिलांच्या काळापासून राजकारणात आहेत. धनंजय मुंडेंचा जन्मही झाला नसेल तेव्हापासून पंडित कुटुंब राजकारणात आहे. धनंजय मुंडेंचा अभ्यास कमी आहे असे म्हणत त्यांनी लक्ष्मण हाकेंचा समाचार घेतला. लक्ष्मण हाकेंनी बीडमध्ये येवून मोठ्या वल्गना करत जावू नयेत, हाकेंना त्यांच्या मतदारसंघात २५३ मते मिळाली आहेत ते काय आम्हाला मदत करणार? असा सवाल सोळंके यांनी उपस्थित केला. बीडच्या ओबीसीच्या मेळाव्यात छगन भुजबळ जे बोलले, ते कितपत योग्य आहे. कारण तेच मंत्री आहेत असे सोळंके म्हणाले. मंत्रिमंडळामध्ये असताना हैदराबाद गॅझेटचा जीआर कॅबिनेटचा निर्णय होता. तरी तुम्ही मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या विरोधात बोलता, त्यांनी त्यांचे मत व्यक्त करावे, त्यांनी बोलावे पण मंत्रीपद सोडून असा प्रतिहल्ला प्रकाश सोळंके यांनी केला.

## बीड शहरातील....

प्रेरणा यश कसबे, यांच्यासह बीड शहरातील अनेक हिंदू–मुस्लिम महिलांनी छ.संभाजीनगर येथील अंबादास दानवे यांच्या संपर्क कार्यालयात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात जाहीर प्रवेश केला. या प्रवेशामुळे बीड शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट यांना मोठा झटका बसलेला आहे व भविष्यात शिवसेनेची ताकद वाढण्यासाठी मोठी मदत होणार आहे.

यावेळी बोलताना शिवसेना नेते अंबादास दानवे यांनी असे म्हटले की बीड जिल्हा हा पूर्वीपासूनच शिवसेनेला मानणारा जिल्हा आहे. परंतु शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे साहेबांनी ज्यांना आशीर्वाद देऊन मोठे केले त्यांनी पुढे चालून पक्षासोबत बेईमानी केली परंतु जे निष्ठावंत शिवसैनिक होते किंबहुना आहेत त्यांनी मात्र पक्षाचे इमान कधीही सोडले नाही. जिल्हाप्रमुख गणेश वरेकर हे सुद्धा अत्यंत पोट तिडकेने काम करत आहेत आज बीड शहरातून एवढ्या मोठ्या प्रमाणात हिंदू मुस्लिम महिला

◆ पान १ वरून पुढे...

एकवटून संभाजीनगर सारखे ठिकाणी प्रवेश करण्यासाठी येतात हे कशाचं धोतक आहे. आता इथून पुढे एक दिलाने काम करून येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकरिता यश प्राप्त करण्यासाठी मी सुद्धा बीड जिल्ह्यावर वैयक्तिक लक्ष घालत असून शिवसेनेला पूर्वीसारखे गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी मी कायम पाठीशी आहे.

पुन्हा एकदा आपल्याला तळागाळातील बांधणी करायची असून सर्व शिवसेना पदाधिकाऱ्यांनी इमाने इतबारे काम करावे व पक्ष संघटना वाढवण्यासाठी साथ द्यावी. यावेळी तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन, नुजाहत सिद्दिकी, शेख यास्मिन, बिलाल भाई, यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या प्रवेश सोहळ्याच्या कार्यक्रमाला बीड शहरातील हिंदू मुस्लिम महिला व व पुरुष शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बाजीराव रस्त्यावर...

इमिटेशन ज्वेलरीचे दुकान आहे. दिवाळीमुळे गुरुवारी रात्री उशिरापर्यंत दुकान सुरू होते. रात्री साडेदहाच्या सुमारास दुकान बंद करून व्यावसायिक त्यांच्या शुक्रवार पेठेतील घराकडे दुचाकीवरून निघाले होते. त्यांनी व्यवसायातून जमा झालेली १ लाख ३० हजार रुपयांची रोकड दुचाकींच्या डिक्कीत ठेवली होती.

बाजीराव रस्त्यावरील टेलीफोन भवनजवळील गल्लीतून जात असताना, दुचाकीवरून आलेल्या दोन चोरट्यांनी त्यांना अडवते. चोरट्यांनी व्यावसायिकाला जीवे मारण्याची धमकी देत धक्काबुक्की केली. घाबरलेल्या व्यावसायिकाने दुचाकीच्या डिक्कीतील रोकड चोरट्यांना दिली. त्यानंतर चोरटे भरधाव वेगाने पसार झाले. या घटनेनंतर व्यावसायिकाने खडक पोलिस ठाण्यात माहिती दिली. वरिष्ठ पोलिस निरीक्षक शशिकांत चव्हाण यांनी घटनास्थळी भेट दिली. पोलिसांनी बाजीराव रस्ता आणि सुभाषनगर परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली असून, पसार झालेल्या चोरट्यांचा शोध सुरू आहे. दरम्यान, दिवाळीच्या काळात व्यापायाला लुटण्याची ही दुसरी घटना आहे. दुचाकीस्वार व्यापायाला धमकावून त्याच्याकडील ४५ हजारांची रोकड लुटण्यात आल्याची घटना बिबवेवाडी–गंगाधाम रस्त्यावर नुकतीच घडली. बिबवेवाडी– गंगाधाम रस्त्याने निघाले होते. त्यावेळी दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांनी त्यांना अडवले. चोरट्यांनी त्यांना धमकावून खिशातील ४५ हजारांची रोकड लुटली. व्यापाऱ्याने आरडाओरडा केला. दिवाळीत व्यापाऱ्यांना लूटण्यात आल्याची दुसरी घटना घडल्याने घबराट उडाली आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## लोकसेवक श्री....

वडील क्षीरसागर कुटुंबीय यांचे खंदे समर्थक तथा त्यांच्या माध्यमातून गावचा विकास करण्यासाठी सातत्याने ध्यास घेतातच परंतु पंचायत समिती च–हाटा व जिल्हा परिषद लिंबागणेश मधील सर्व गावांचा सातत्याने अनेक अडचणींचा पाढा वाचतात. नव्हे नव्हे तस ते अण्णांकडे अग्र धरून प्रश्न सोडवण्यासाठी विनंती करतात व पुढे येतात. परिसरातील सर्व डोंगरपट्यात नेहमी भेटीगाठी, अडीअडचणी वेळी हे कुटुंब सहकार्य वृतीने कार्य करताना सर्वजण पाहत आले आहेत. युवा पिढीला सोबत घेत सरपंच सचिन बहिरवाळ यांनी तरुणांची मोट बांधली असून परिसरातील गोरगरीब जनतेला योग्य न्याय मिळवून देण्यासाठी, त्यांच्या समस्याची जाण व ती सोडविण्यासाठी सतत प्रयत्नशील राहून माझी कॅबिनेट मंत्री श्री. जयदत्तजी क्षीरसागर व मा. योगेश भैय्या क्षीरसागर यांच्या मार्गदर्शन व सहकार्याने सोडविण्याचा त्यांना अनुभव आहे. कोरोना महामारीत जवळचे नातेवाईक एकमेकांना सोबत राहत नव्हते, अशा वेळी या कोरोना योध्याने जीवाचे रान करून परिसरातील सर्वांना हवी ती मदत मिळवून दिली आहे. कोरोना काळात व अडचणीच्या काळात नेहमी सर्वांच्या तोंडात एकच नाव सहज येते ते म्हणजे सचिन दादाराव बहिरवाळ. याचे कारण हाच व्यक्ती आमची अडचण समजून सोडवू शकतो याचा विश्वास लोकांना आहे. सरपंच कार्यकाळात यांनी सर्व शासकीय योजना पात्र लाभार्थी पर्यंत यशस्वी पणे पोहचविलेल्या आहेत. कार्यतत्पर सरपंच, जनसेवक, लोकसेवक म्हणुन कार्य केलेले आहे. १००% समाजकारण याविचारातून आपल्या लोकांना मदत होईल हाच विचार ठेऊन हे कुटुंब कार्य करत आहे.सामाजिक संघटनेच्या माध्यमातून समाजातील सर्व तरुणांना ,जेष्ठांना एकत्रित करून समाजहिताचे उपक्रम सचिन दादाराव बहिरवाळ राबवताना दिसून येत आहे; म्हणून परिसरातील सर्व गावातील जेष्ठ व तरुण

◆ पान ४ वरून पुढे...

बांधवानी यांना यावेळी पंचायत समिती सभागृहात पाठविण्याचा निर्धार पक्का केलेला आहे. मा. योगेश भैय्या क्षीरसागर यांनी अशा निष्ठावान कार्यतत्पर युवा जनसेवकास चऱ्हाटा पंचायत समिती गणातून संधी दयावी, अशी गावागावातून मागणी होत आहे. सर्व समाज ही निवडणूक स्वतःची निवडणूक समजून बहुमताने आपला आवाज सभागृहात पाठविल्याशिवाय राहणारं नाही असा ठाम विश्वास व्यक्त होताना दिसून येत आहे. बालाघाटाच्या डोंगर पायथ्याशी सर्व गावांमध्ये आरोग्य शिबिरासाठी धडपड करून प्रत्येक गावामध्ये आरोग्य शिबिर राबवलेले आहे. याचे श्रेय माननीय श्री जयदत्त अण्णा क्षीरसागर, श्री रवींद्र दादा क्षीरसागर व युवक नेतृत्व श्री. योगेश भैय्या क्षीरसागर हे आहेत. म्हणूनच या सगळ्या गोष्टींचा परिपाक पाहता येणारा काळ हा क्षीरसागरांचे एक लढवय्या यौध्दे म्हणून श्री. सचिन दादाराव बहिरवाळ यांना सेवेची संधी मिळावी अशी जनसामान्यांची इच्छा आहे.

## दिव्यांग बांधवांच्या...

तालुक्यातील दिव्यांग बांधवांना शासकीय योजनांचा लाभ मिळवुन देण्यासाठी आ. विजयसिंह पंडित यांच्या कार्यालयात वेगळा कक्ष कार्यान्वीत करण्यात आला आहे. दिव्यांग बांधवांच्या सक्षमीकरणासाठी शिवछत्र परिवाराकडुन जाणिवपुर्वक प्रयत्न होत आहेत. शनिवार दि. १८ ऑक्टोबर रोजी कृष्णाई कार्यालयात आयोजित केलेल्या कार्यक्रमात १६४ दिव्यांग बांधवांना संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील मंजुरी पत्राचे माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या शुभहस्ते सन्मानपुर्वक वितरण करण्यात आले. यापुर्वी ४० दिव्यांग लाभार्थ्यांना मंजुरी पत्राचे वाटप करण्यात आले होते. आ. विजयसिंह पंडित यांच्या माध्यमातुन दिव्यांग बांधवांचे प्रश्न मार्गी लागत असल्याचे समाधान यावेळी लाभार्थ्यांच्या चेहर्यावर दिसत होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नायब तहसिलदार संजय

◆ पान ४ वरून पुढे...

सोनवणे यांनी केले. कार्यक्रमाला गेवराई तालुक्यातील दिव्यांग बांधव व त्यांचे नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी उपस्थितांना दिपावलीच्या शुभेच्छा दिल्या तर शिवछत्र परिवाराच्या वतीने दिपावली निमित्त आयोजित केलेल्या स्नेहभोजनाचा लाभ दिव्यांग बांधव व उपस्थितांनी घेतला.

यावेळी बोलतांना अमरसिंह पंडित म्हणाले की, येणार्या काळात गेवराई विधानसभा मतदार संघातील एकही दिव्यांग बांधव शासनाच्या रास्त योजनेच्या लाभापासुन वंचित राहणार नाही याची आपण काळजी घेवु. गेवराई येथील कार्यालयात सुरु केलेल्या दिव्यांग कक्षाची माहिती देवुन कोणत्याही कार्यालयात दिव्यांग बांधवांची आडवणुक होत असल्यास थेट संपर्क करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. गेवराई नगर परिषदेच्या वतीने शहरात दिव्यांग बांधवांना दिला जाणारा दिव्यांग निधी अनेक वर्षापासुन थकीत होता, तो हक्काचा निधी वाटप करुन त्यांना न्याय देण्याचे काम आपण केल्याचेही यावेळी अमरसिंह पंडित यांनी सांगितले. महायुती सरकारने दिव्यांग बांधवांच्या मानधनामध्ये घसघसीत वाढ केली असुन आता प्रतिमाह आडीच हजार रुपये मानधन मिळणार असल्याचे सांगतांना अमरसिंह पंडित यांनी महायुती सरकारचे आभार मानले. कार्यक्रमाला गेवराई तालुक्यातील दिव्यांग बांधव व त्यांचे नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिवछत्र परिवाराने आयोजित केलेल्या स्नेहभोजनाचा लाभ यावेळी त्यांनी घेतला. बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी पवार, संग्राम आहेर, श्रीराम आरगडे, रफीक सौदागर, बाबासाहेब चव्हाण, राधाकिसन चक्कर, महेश ढेरे, बाबासाहेब खोसे, दादासाहेब घोडके, सुभाष गुंजाळ यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महिला कुस्ती...

◆ पान ४ वरून पुढे...

क्रीडा प्रकारातील या दैदित्य मान यशाबद्दल पदव्युत्तर संचालक प्रा. सुधाकर वनवे, उपप्राचार्य प्रा. गणपती ढवळशांक प्रा. विलास भिलारे, प्रा. सुधीर माने, प्रा. डॉक्टर प्रशांत साबळे यांनी कौतुक केले आहे.

## काझी सईद...

सामाजिक न्याय यांची वाढ झाली आहे. त्यांच्या प्रयत्नांनी समाजात सकारात्मक बदल घडवले असून ते नव्या पिढीसाठी एक प्रेरणास्थान ठरत आहेत.

## आमदार सुरेश...

यामुळे स्व. राजेंद्र गोल्हार यांच्या पत्नी सौ. कौशल्या गर्जे यांना १० लाख रुपयांची तातडीची मदत सुपूर्त करण्यात आली असून, उर्वरित १५ लाख रुपयांची मुदत ठेव रक्कम दोन दिवसांत त्यांच्या बँक खात्यात जमा होणार आहे. या आर्थिक मदतीमुळे कुटुंबाला गंभीर संकटात थोडासा आधार मिळाला आहे. आमदार सुरेश धस यांच्या पुढाकारामुळे कुटुंबाला आवश्यक ती मदत मिळाली आणि प्रशासनिक प्रक्रिया त्वरीत पार पडली. या प्रसंगी विभागीय वन अधिकारी गर्कळ साहेब, वनपरीक्षेत्र अधिकारी मुंडे, मा. सभापती लक्ष्मण ननवरे, बाबू गर्जे,पोपट गर्जे,धनंजय तरटे, अक्षय लटपटे व सरपंच,उपसरपंच,स्थानिक ग्रामस्थ आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पंचायत समितीला...

महिलांसाठीचे स्वच्छतागृह पुन्हा खुले करण्यात आल्याने महिला कर्मचाऱ्यांसह अभ्यागतांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. त्यामुळे सोमवार, दि.२० रोजी होणारे पंचायत समितीला कुलूप ठोका आंदोलन स्थगित करण्यात आले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# ‘सण महाराष्ट्राचा, संकल्प अन्न सुरक्षिततेचा’ विशेष तपासणी अभियानांतर्गत राज्यात 3 हजार 485 अन्न आस्थापनांची तपासणी

**मुंबई । प्रतिनिधी**

अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत राज्यात ‘सण महाराष्ट्राचा, संकल्प अन्न सुरक्षिततेचा’ हे विशेष तपासणी अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत १२ ऑक्टोबर २०२५ पर्यंत राज्यात ३ हजार ४८५ अन्न आस्थापनांची तपासणी करण्यात आली. तपासणीमध्ये दूध, खवा/मावा, खाद्यतेल, तूप, मिठाई, ड्रायफ्रूट्स, चॉकलेट्स, भगर व अन्य अन्नपदार्थांचे एकूण ४ हजार ६७६ नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले. या तपासणीत अनियमितता आढळलेल्या एक हजार ४३१ आस्थापनांना सुधारणा नोटीस देण्यात आली असून ४८ आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यात आले तर एका आस्थापनेचा परवाना रद्द करण्यात आला असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासन विभागाने दिली आहे. जनतेस सुरक्षित, दर्जेदार अन्न उपलब्ध करून देण्यासाठी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, राज्यमंत्री योगेश कदम, सचिव धीरज कुमार व आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न व औषध प्रशासना



विभागांमार्फत राज्यात सणासुदीच्या कालावधीत अन्नपदार्थांमध्ये होणारी भेसळ रोखण्यासाठी ‘सण महाराष्ट्राचा, संकल्प अन्न सुरक्षिततेचा’ हे विशेष तपासणी अभियान राबविण्यात येत आहे. हे अभियान दिनांक ११ ऑगस्ट २०२५ ते २५ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत राबविण्यात येत आहे. नागरिकांनीही सणासुदीच्या काळात अन्नपदार्थ खरेदी करताना गुणवत्ता, पॅकिंगवरील माहिती आणि परवाना क्रमांक यांची खात्री करूनच खरेदी करावी. भेसळीबाबत संशय आल्यास जवळच्या अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांशी त्वरित संपर्क साधावा, असे आवाहन अन्न व औषध प्रशासन विभागाने केले आहे.

## कांदा प्रक्रिया उद्योगाला चालना देण्यासाठी चिंचोंडी औद्योगिक वसाहतीत प्रकल्प उभा राहणार : मंत्री छगन भुजबळ

### येवला कृषि उत्पन्न बाजार समितीच्या नूतन कार्यालयाचे मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते उद्घाटन

**नाशिक । प्रतिनिधी**

येवला बाजार समितीत शेतकरी भवन निर्माण करण्यासाठी १.५० कोटी निधी उपलब्ध करून दिला जाईल. याबाबतचा प्रस्ताव बाजार समितीने तातडीने सादर करावा. यासोबतच कांदा प्रक्रिया उद्योगाला चालना मिळण्यासाठी चिचोंडी औद्योगिक वसाहतीत ५० एकर जागेवर प्रकल्प उभारण्यात येत असलूयाचे प्रतिपादन राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले.



येवला कृषि उत्पन्न बाजार समितीच्या नूतनीकरण करण्यात आलेल्या कार्यालयाचे उद्घाटन आज राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी माजी आमदार मारोतीराव पवार, तहसीलदार आबा महाजन, येवला नगरपालिकेचे मुख्याधिकारी तुषार आहेर, गटविकास अधिकारी संदीप वायाळ, सहायक निबंधक श्री.राजपूत, अंबादास बनकर, राधाकिसन सोनवणे, अरुणमामा थोरात, वसंत पवार, संभाजी पवार, येवला बाजार समितीच्या सभापती सविता पवार, उपसभापती संध्या पगारे, रायभान काळे, माजी सभापती किसन धनगे, संचालक संजय बनकर यांच्यासह सभासद, नागरिक व शेतकरी उपस्थित होते.

मंत्री श्री. भुजबळ म्हणाले की, अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीच्या अगोदर मदत उपलब्ध होणार आहे. शेतकऱ्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी प्रशासकीय कार्यालय चांगले असले पाहिजे. त्यादृष्टीने हे तयार केलेले कार्यालय हे फक्त एक कार्यालय नाही, तर ती शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणाचा एक नवा अध्याय आहे. येवला बाजार समिती ही केवळ व्यवहार करणारी संस्था नाही, तर ती शेतकऱ्यांच्या प्रगतीचा केंद्रबिंदू आहे. शेती क्षेत्रात स्पर्धा वाढली आहे. शेतमालाची गुणवत्ता, साठवण, वाहतूक आणि विपणन या सगळ्या गोष्टींमध्ये नव्या तंत्रज्ञानाची आणि सुविधा विकासाची गरज आहे. या सर्व बाबी लक्षात घेऊन येवला बाजार समितीच्या शेतकऱ्यांना आवश्यक त्या सुविधा निर्माण करण्यासाठी आपण नेहमी प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.

## एका फोनवर ६५०० खात्यांमधून ५८०००००० रुपयांचा महाघोटाळा! महाराष्ट्रात भारतातील पहिला आणि सर्वात मोठा ट्रेडिंग घोटाळा

**मुंबई । प्रतिनिधी**

सरकार, केंद्रीय संस्था आणि पोलिस सायबर फसवणुकीविरुद्ध सतत जागरूकता मोहिमा राबवतात. तरीही, लोक अजूनही डिजीटल फसवणुकीला बळी पडत आहेत. देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईतही असाच एक प्रकार उघडकीस आला आहे. हा देशातील सर्वात मोठा डिजिटल घोटाळा मानला जात आहे. मुंबईतील एका ७२ वर्षीय व्यावसायिकाला आतापर्यंत देशातील सर्वात मोठ्या डिजिटल फसवणुकीचा सामना करावा लागला आहे. काही महिन्यांपूर्वीच, त्याने एका औषध कंपनीतील आपला हिस्सा विकून अंदाजे ५० कोटी रुपये कमावले होते. हा सगला पैसा सायबर भामट्यांनी लुटला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार या फसवणुकीला बळी पडलेल्या व्यक्तीला १९ ऑगस्ट रोजी पहिला व्हिडिओ कॉल आला.

वृद्ध पुरूष आणि त्याची पत्नी (जी पूर्वी बँकिंग क्षेत्रात काम करत होती) फसवणूक करणाऱ्यांच्या डिजिटल पकडीत अडकली. त्यांना २७ दिवस चार वेगवेगळ्या बँकांमध्ये व्यवहार करण्यास भाग पाडण्यात आले, तर फसवणूक करणारे त्यांच्या प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी सतत फोन कॉलवर होते. घरी, त्यांना मोबाइल कॅमेऱ्यासमोर डिजिटल अटकेत ठेवण्यात आले. फसवणूक करणाऱ्यांनी त्यांना बनावट पोलिस स्टेशन आणि कोर्टाचे दृश्य दाखवले आणि ते खऱ्या कायदा अंमलबजावणी संस्थांशी बोलत आहेत असे पटवून दिले. त्यांनी पीडितांना कागदपत्रे दाखवली आणि सांगितले की त्यांच्या खात्यात बेकायदेशीर पैसे आहेत आणि त्यांना चौकशीसाठी संपूर्ण रक्कम त्यांच्या खात्यात हस्तांतरित करावी लागेल. १९ ऑगस्ट ते २९ सप्टेंबर दरम्यान, वृद्ध जोडप्याने फसवणूक करणाऱ्यांनी दिलेल्या खात्यांमध्ये आरटीजीएसद्वारे एकूण ५८.१३ कोटी रुपये हस्तांतरित केले. या काळात त्यांनी कोणत्याही बँकेला माहिती दिली नाही, ना त्यांच्या मुलांना (जे परदेशात शिक्षण घेत आहेत) किंवा शेजाऱ्यांना माहिती दिली. फसवणूक करणाऱ्यांनी पत्नीच्या खात्यात उर्वरित २ कोटी रुपये मागितले तेव्हा हे प्रकरण उघडकीस आले. जोडप्याने एका मित्राशी सल्लामसलत केली आणि तेव्हाच त्यांना फसवणूक झाल्याचे लक्षात आले. अटक आरोपींची नावे – जिजिल सॅबेस्टियन, वय ४४ वर्षे, धंदा नोकरी, रा.ठी. क. २६, क्लालिस प्रेसिडंसी ले आउट, एस.बींगीपुरा, हुल्लाहाल्ली, बेंगलोर, कर्नाटक, दिपायन तपन बानर्जी, वय ३०, रा.ठी. २६६३/२५, सी मेन रोड, एचएसआर फस्ट लेआउट, बेंगलोर, कर्नाटक, डॅनियल अरुमुघम, वय २५ वर्षे, रा.ठी. ४३९, ५ वा मजला, ७ वा क्रोस, जगदीशनगर, बेंगलोर, कर्नाटक यांना दिनांक ०९/१०/२५ रोजी २२:३५ वा. बेंगलोर, कर्नाटक येथे अटक, चंद्रशेखर भिमसेन नाईक, वय ४२ वर्षे, रा.ठी. पी/३०३, गजराज सोसायटी, कोपरी पोलीस स्टेशन समोर, कोपरी, ठाणे (पूर्व)

## राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी दिल्या दिवाळीच्या शुभेच्छा



**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र व गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी दिवाळीनिमित्त नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत.

दिवाळीचा सण अंधकारावर प्रकाशाचा, अन्यायावर न्यायाचा आणि नकारात्मकतेवर सकारात्मकतेच्या विजयाचे प्रतीक आहे. या निमित्त सर्वांना स्वदेशी उत्पादनांचा स्वीकार करण्याचे आवाहन करतो. पर्यावरण रक्षण, नैसर्गिक संसाधनांचा आदर आणि नैसर्गिक शेती यासारख्या शाश्वत जीवन मूल्यांचा अवलंब करून उज्ज्वल, समृद्ध आणि स्वावलंबी भारताच्या उभारणीत सहभागी व्हावे, असे आवाहन करतो. ही दिवाळी सर्वांच्या जीवनात आनंद, शांती, आरोग्य आणि समृद्धी घेऊन येवो या शुभेच्छा देतो, असे राज्यपालांनी आपल्या संदेशात म्हटले आहे.

## पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी अनाथ मुलांसोबत साजरी केली दिवाळी


**मुंबई । प्रतिनिधी**

दिवाळीचा सण म्हणजे फक्त दिव्यांचा, फटाक्यांचा किंवा सजावटीचा उत्सव नाही तर तो माणुसकीचा, प्रेमाचा आणि एकोप्याचा उत्सव आहे, हा विचार करून पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी आज एका आगळ्यावेगळ्या आणि हृदयस्पर्शी कार्यक्रमात अनाथ मुलांसोबत दिवाळी साजरी केली. या मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून मंत्री श्रीमती मुंडे भावूक झाल्या. केंद्र शासनाच्या सांस्कृतिक मंत्रालय आणि द चिल्ड्रन्स एड सोसायटी फॉर अंडरप्रिव्हिलेज्ड किड्स ऑर्फनेजच्या यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय आधुनिक कला दालन, मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात श्रीमती मुंडे यांनी भेट दिली.

## साहित्य संघ गिरगाव मुंबई येथे दिवाळी पहाट सांस्कृतिक कार्यक्रम

**मुंबई । प्रतिनिधी**

सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्यावतीने रसिकांची दिवाळी स्वर संगीताने उजळण्यासाठी गाजलेल्या चित्रपट गीतांचा व भावगीतांचा बहारदार कार्यक्रम दिवाळी पहाट साहित्य संघ गिरगाव मुंबई येथे आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड आशिष




शेलार यांच्या संकल्पनेतून आणि सांस्कृतिक कार्य सचिव डॉ. किरण कुलकर्णी (भाप्रसे) यांच्या मार्गदर्शनातून होणार आहे. यंदा राज्यात दहा ठिकाणी दिवाळी पहाट या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. १९ ऑक्टोबर २०२५ रोजी पहाटे ६.३० वाजता साहित्य संघ गिरगाव मुंबई येथे रंगणाऱ्या या कार्यक्रमात गाजलेल्या चित्रपट गीतांचा व भावगीतांचा कार्यक्रम रसिकांसाठी सादर होणार आहेत. ज्येष्ठ गायिका उत्तरा केळकर, सोनाली कर्णिक, दत्तात्रय मेस्त्री, अभिषेक नलावडे, धनश्री देशपांडे संगीत संयोजन अमित गोठीवरेकर हे करणार आहेत तर निवेदन अमित काकडे करतील. हा कार्यक्रम रसिक प्रेक्षकांना विनामूल्य पाहता येणार आहे. या कार्यक्रमास जास्तीत जास्त रसिक प्रेक्षकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक विभीषण चवरे यांनी केले आहे.

## भारतीय सशस्त्र सैन्यदलात अधिकारी पदाच्या तयारीसाठी सुवर्णसंधी एस.एस.बी. कोर्ससाठी मोफत प्रशिक्षण

**मुंबई । प्रतिनिधी**

भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्याची इच्छा असलेल्या महाराष्ट्रातील युवक-युवतींसाठी एक सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे महाराष्ट्र शासनाच्या वतीने दिनांक ३ नोव्हेंबर २०२५ ते १२ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत एस.एस.बी. (SSB) कोर्स क्र. ६३ आयोजित करण्यात आला आहे. या कोर्समध्ये प्रशिक्षणार्थींना निःशुल्क प्रशिक्षण, निवास आणि भोजनाची सोय करण्यात आली आहे.

मुंबई शहर जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी दिनांक २० ऑक्टोबर २०२५ रोजी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, मुंबई शहर येथे मुलाखतीस हजर रहावे. उमेदवारांनी सैनिक कल्याण विभाग (Department of Sainik Welfare, Pune) च्या वेबसाईटवरून SSB-६३ कोर्ससाठी प्रवेशपत्र व त्यासोबतची परिशिष्टे डाउनलोड करून ती पूर्ण भरून, मुलाखतीच्या दिवशी सोबत आणणे आवश्यक आहे.

अधिक माहितीसाठी इच्छुकांनी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे ईमेल (training.petenashik@gmail.com), दूरध्वनी क्रमांक 0253-2451032 किंवा व्हॉट्सॲप नंबर 9156073306 वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, मुंबई शहर यांनी केले आहे.

## सौ.के.एस.के.महाविद्यालयात भारताचे लोकप्रिय माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती साजरी

**बीड । प्रतिनिधी**

येथील सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात नवगण शिक्षण संस्था राजुरी नवगणच्या उपाध्यक्ष प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर यांच्या मार्गर्शनानुसार १५ ऑक्टोंबर हा डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून जयंती साजरी करण्यात आली.



कार्यक्रमाचे प्रास्ताविकात प्रा. प्रदिप साळुंके म्हणाले की, डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जन्म यांच्या एकूण शिक्षण संशोधन आणि कार्य याचा अभ्यासपूर्ण आलेख या प्रसंगी व्यक्त केला.त्यांचा जन्म १५ ऑक्टोंबर १९३१ मध्ये तामिळनाडू च्या रामेश्वर या ठिकाणी झाला. त्यांनी पुढील चार दशके डीआरडीओ व इस्त्रो येथे काम केले. त्यांचे अग्नी क्षेपनास्त्र, नाग क्षेपनास्त्र, अवकाश क्षेपनास्त्र बनवण्यामध्ये महत्वपुर्ण योगदान आहे. तसेच यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर यांनी अशा महान व्यक्तींच्या मौलिक विचारांचा आदर्श घ्यावा व भारतास एक विकसीतराष्ट्र बनण्यात योगदान द्यावे असे मत व्यक्त केले. यावेळी वाचन प्रेरणा दिनानिमित्त महान व्यक्तीचें मौलिक विचारांचे सामुहिकरित्या वाचन करण्यात आले. तसेच वृत्तपत्र वाचन,अग्रलेख यांचे प्रामुख्याने वाचन केले पाहिजे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शेख जी. आय. ग्रंथपाल यांन केले तर आभार श्री. अंगद दराडे यांनी मानले.

या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर, उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे , पदव्युत्तर संचालक डॉ.खान अन्सारउल्ला शफिउल्ला,कमविचे उपप्राचार्य डॉ. नारायण काकाडे, पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर,कर्मचारी प्रतिनिधी प्रा. इमाद सर, ग्रंथपाल शेख जी.आय.तसेच ग्रंथालयातील कर्मचारी लक्ष्मण सोन्नर, बहिरवाळ, नुरुल्ला खान, रेयान सय्यद व महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

# वाचन संस्कृती जोपासून सुसंस्कृत पाल्य घडविणे पालकांचे कर्तव्य :प्रो. डॉ. मनोहर सिरसट

### प्रकाश आंबेडकर नगर बीड येथे डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांची जयंती विविध उपक्रमाने संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

वाचाल तर वाचाल हा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अनमोल उपदेश लक्षात ठेवून वाचन संस्कृती जोपासून सुसंस्कारित पिढी घडविण्यासाठी पालकांनी लहानपणीच आपल्या पाल्यांच्या हातात चांगली पुस्तके देऊन आपले पाल्य सुजाण,सदाचारी नागरिक बनण्याकरिता प्रयत्नांची पराकाष्ठा करणे हे पालकांचे आद्य कर्तव्य आहे ; माजी राष्ट्रपती थोर शास्त्रज्ञ भारतरत्न डॉ.ए पी जे अब्दुल कलाम यांना वाचन प्रेरणा दिनानिमित्त हेच खरे अभिवादन ठरेल असे प्रतिपादन प्रो. डॉ. मनोहर सिरसट यांनी केले. महामानव अभिवादन ग्रुप संचलित मोफत शिकवणी वर्ग प्रकाश आंबेडकर नगर बीड येथे वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालयातर्फे माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम व कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांची संयुक्त जयंती विविध उपक्रमाने संपन्न करून वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला.या कार्यक्रमास अध्यक्षपदी से.नी. सी.ई.ओ( जि. प )आयु.पी व्ही बनसोडे तर प्रो.डॉ. मनोहर सिरसट,प्रो डॉ. उपप्रचार्य उत्तमराव साळवे, सिद्धार्थ शिनगारे व एस. एस सोनवणे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते विचार पिठावर महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम भोले, समता सैनिक दलाचे मेजर जनरल कॅम्टन राजाभाऊ आठवले, प्राध्यापक अशोक गायकवाड व ड तेजस वडमारे यांची प्रमुख उपस्थिती होती.सर्वप्रथम आदर्शांची पूजा करून डॉ. एपीजे अब्दुल कलाम व दादासाहेब गायकवाड यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्प व पुष्पमाला अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक वाचाल तर वाचाल चे आयु डी.जी वानखेडे यांनी केले तर सूत्रसंचालन डी. एम राऊत यांनी केले. वाचन प्रेरणा दिनानिमित्त सामान्य ज्ञान स्पर्धा घेण्यात आली होती त्या स्पर्धेतील प्रथम बक्षीस १००० रुपये प्रा. डॉ. नामदेव शिनगारे, द्वितीय बक्षीस ७०० रुपयांची स्पर्धा परीक्षेकरिता उपयोगी ११ पुस्तकांचा संच वाचाल तर वाचाल तर्फे,तिसरे बक्षीस ५०० रुपये पी. व्ही बनसोडे यांनी दिले व ८ विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ प्रत्येकी १०० रुपये बक्षीस समाजसेवक प्रशांत वासनिक व यु एस वाघमारे यांच्यातर्फे मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. तसेच ९ वी ते १२ वी वर्गातील खुल्या गटातील ३ विद्यार्थ्यांना बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथ वाचनालयातर्फे देण्यात आला. ह्या प्रसंगी वाचन प्रेरणा दिना बद्दल,भारतीय संविधानाचे अमृत महोत्सवा बद्दल व संविधाना बद्दल तसेच पंचशीलाचे महत्व अस्खलित व मधुर आवाजात पंचशील म्हणून पालीचा मराठी अर्थ सांगणाऱ्या विद्यार्थ्यांना आदर्श महापुरुषांचे व महामातांचे जीवन चरित्र पुस्तके व पुष्प देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच मासिक घटक चाचणीतील गुणवंत ८ विद्यार्थ्यांना वही व पेनाचे वाटप करण्यात आले. वाचाल तर



वाचाल चे पहिले केंद्र असलेल्या या केंद्रास आठव्या फेरीतील ५० पुस्तकांचा संच शिक्षिका विशाखा वाघमारे यांना सुपूर्द करण्यात आला वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालयाला प्रो.डॉ मनोहर सिरसट यांनी स्वलिखित महामानावाची पुस्तके, सुंबरण व आदर्श महापुरुषांची जीवन चरित्र अशी ११ पुस्तके वाचनालयाला भेट दिली. विद्यार्थ्यांशी हितगुज साधताना प्रो डॉ. उत्तमराव साळवे म्हणाले की डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून उच्च शिक्षण घेऊन कर्तुत्वान बना व आपल्या कार्यातून तुमच्या हातून समाजसेवा घडो असा उपदेश केला. डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या व डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे उजवाहात समजल्या जाणाऱ्या थोर समाजसेवक दादासाहेब गायकवाड यांच्या जयंतीदिनी हे सोप्या भाषेत अनेक उदाहरणाद्वारे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • रविवार, दि. १९ ऑक्टोबर २०२५ • पान ४

# लोकसेवक श्री. सचिन बहिरवाळच असावेत पंचायत समिती सदस्य पदाचे उमेदवार

## जनतेतून जोरदार मागणी





- जनतेच्या हितासाठी काम करणारा तळागाळातील युवा कार्यकर्ता श्री. सचिन दादाराव बहिरवाळ यांना पंचायत समितीची उमेदवारी दयावी.
- सेवा, संघर्ष आणि समर्पण – श्री सचिन दादाराव बहिरवाळ या जनसेवकाची ओळख. यांना पंचायत समिती सदस्य बनविण्याचा जनतेचा निर्धार.
- जनतेच्या मनात आपलेपणाचे स्थान मिळवणारा कार्यकर्ता श्री. सचिन बहिरवाळ यांना बीड पंचायत समितीमध्ये पाठवण्याचा ठाम निर्धार .
- निवडणुका अगोदरच जनतेचा विश्वास जिंकलेला जनसेवक म्हणजे सचिन बहिरवाळ.
- जनतेच्या विकासासाठी सचिन बहिरवाळ यांना चऱ्हाटा पंचायत समिती निवडणुकीत जनसमर्थन वाढतंय!
- विकासाच्या आधारावर जनतेत लोकप्रिय ठरलेला युवक सचिन बहिरवाळ उतरणार पंचायत समिती रिंगणात.

**बीड । प्रतिनिधी**

लिंबागणेश सर्कल पंचायत समिती चऱ्हाटा गण ता. बीड येथून बीड राष्ट्रवादी काँग्रेस विधानसभा अध्यक्ष श्री. योगेश भैय्या क्षीरसागर यांचे विश्वासू व माजी सरपंच ग्रुप ग्रामपंचायत भाळवणी, सुर्याचीवाडी , देव-याचीवाडी श्री सचिन दादाराव बहिरवाळ हे सर्व तरुणांच्या गळ्यातील ताईत आहेत. श्री. दादाराव बहिरवाळ पाटील हे माजी खासदार स्वर्गीय केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू व महाराष्ट्र राज्याचे माजी कॅबिनेट मंत्री माननीय जयदत्तजी अण्णा क्षीरसागर यांचे खंदे समर्थक आहेत. दादाराव बहिरवाळ व क्षीरसागर कुटुंबीय हे समीकरण गेल्या दोन पिढ्यापासूनचे आहे. क्षीरसागर कुटुंबीयांचे बहिरवाळ कुटुंब हे एक निष्ठावंत व आज्ञाधारक आहे. नेतृत्व म्हणजे केवळ सत्ता नाही, तर संघर्ष आणि त्यागाचे प्रतीक आहे हे यांनी आपल्या कार्यातून दाखवून दिले आहे. गावातील सर्व समाजाला सोबत घेऊन गावची प्रगती सातत्याने केलेली आहे. एक निष्ठावंत सर्वांच्या अडीअडचणीला धावून येणारं कुटुंब म्हणून यांची ओळख आहे. श्री. सचिन बहिरवाळ यांचे ▶▶ उर्वरित पान २ वर



# सोमवारी ह.भ.प. श्रीकृष्ण महाराज उबाळे यांची प्रवचन सेवा



**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील बार्शी रोड वरील स्वराज्य नगर येथील रहिवाशी व बीड जिल्ह्यातील सुप्रसिद्ध कीर्तनकार, ह.भ.प. माधव महाराज डाके यांच्या माऊली निवास्थानी प्रतीवर्षा प्रमाणे यावर्षी ही चातुर्मास उत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे, आषाढी एकादशी ते कार्तिक एकादशी या चार महिन्यांच्या पवित्र पर्वकाळात प्रती सोमवारी रात्री ८ ते ९ यावेळेत विविध ज्ञानेश्वरी ग्रंथ प्रेमी महाराज मंडळींची श्री ज्ञानेश्वरी प्रवचन सेवा संपन्न होत आहे. या चातुर्मास उत्सवा निम्मित सोमवार दिनांक २०/१०/२५ रोजी रात्री ८ते९ या वेळेत ह भ प श्रीकृष्ण महाराज उबाळे यांची प्रवचन सेवा होणार आहे. सदरील प्रवचन सेवेचे थेट प्रक्षेपण माधव महाराज डाके काठवडेकर या फेसबुक अकाऊंट वरून होणारअसून, या चातुर्मास उत्सवात आपण सर्वांनी सहभागी होऊन श्री ज्ञानेश्वरी प्रवचन श्रवणनाच लाभ घ्यावा असे आवाहन ह भ प माधव महाराज डाके यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# शालेय तालुकास्तरीय क्रिकेट स्पर्धेत गुरुकुल इंग्लिश स्कुलला प्रथम पारितोषिक



**बीड । प्रतिनिधी**

रोजी चालू असलेल्या क्रिकेटच्या शालेय तालुकास्तरीय स्पर्धा शिदोड येथील मैदानावर तालुका क्रीडा अधिकारी रेवणनाथ शेलार यांच्या उपस्थितीमध्ये संपन्न झाल्या. या १७ वर्षाखालील मुलांच्या स्पर्धेसाठी एकूण १५ संघ सहभागी झाले होते. या तालुकास्तरीय स्पर्धेमध्ये १७ वर्षाखालील मुलांच्या गुरुकुल इंग्लिश स्कूलच्या संघाने फायनल मध्ये पोद्दार इंग्लिश स्कूलला पराभूत करत प्रथम पारितोषिक पटकावले. विजयी संघामधील खेळाडू कर्णधार कृष्णा गायकवाड, धैर्यशील शिंदे, अन्वित सुभेदार, सार्थक कोकरे, दीप काळे,शशांक सारंगकर, सक्षम वारंगुळे, शुभम मुंदडा, रोहन शिंदे, अर्णव शिराळे, आर्यन गदळे वरील सर्व खेळाडू जिल्हास्तरीय शालेय स्पर्धेमध्ये बीड तालुक्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत. या यशाबद्दल गुरुकुल इंग्लिश स्कूलच्या अध्यक्षा डॉ. विनिता ढाकणे, सचिव डॉ.राजेंद्र ढाकणे, कार्यकारी संचालक अखिलेश ढाकणे प्राचार्य शितल सर्वज्ञ उपप्राचार्य सारा मॅडम, गणेश इंगोले, निशांत घुगे, क्रीडा प्रशिक्षक कल्याण माने, रामदास गिरी, महेश गव्हाणे, रुक्मिणी ढोबळे तसेच अन्य प्रशिक्षक व पालकांनी विजयी खेळाडूंचे अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# दिव्यांग बांधवांच्या सक्षमीकरणासाठी कटिबद्ध : अमरसिंह पंडित

## १६४ दिव्यांग लाभार्थ्यांना मंजुरी पत्राचे सन्मानपुर्वक वाटप



**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई विधानसभा मतदार संघातील दिव्यांग बांधवांच्या सक्षमीकरणासाठी शिवछत्र परिवार कटिबद्ध आहे. शासकीय योजनांचा दिव्यांग बांधवांना लाभ मिळवुन देण्यासाठी जाणिवपुर्वक प्रयत्न करत असल्याचे प्रतिपादन माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी केले. धनत्रयोदशीच्या शुभ मुर्हतावर त्यांच्या शुभहस्ते १६४ लाभार्थ्यांना संजय गांधी निराधार अनुदान योजनेच्या मंजुरी पत्राचे सन्मानपुर्वक वाटप करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर नायब तहसिलदार संजय सोनवणे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे, माजी नगरसेवर राधेशाम येवले यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. गेवराई ▶▶ उर्वरित पान २ वर

# महिला कुस्ती स्पर्धेत चौसाळा महाविद्यालयाचे यश



**चौसाळा । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या महिला कुस्ती स्पर्धेत कला व विज्ञान महाविद्यालय चौसाळा येथील विद्यार्थिनी कु. भूमी हलांडे हिने ५३ किलो वजनी गटात संपूर्ण विद्यापीठात द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे. नळदुर्ग येथे पार पडलेल्या आंतर महाविद्यालयीन कुस्ती स्पर्धेत तिने हे यश प्राप्त केले आहे. चौसाळ्यासारख्या ग्रामीण भागातील मुलीने कुस्ती सारख्या क्षेत्रात हे यश मिळवल्याने नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. योगेश भैय्या क्षीरसागर यांच्या हस्ते कु. भूमी व तिचे मार्गदर्शक प्रा. डॉ. संजय कदम यांचा सत्कार करण्यात आला. कु. भूमी हलांडे हिच्या यशाबद्दल नवगण शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्ष डॉ. दीपा क्षीरसागर, संचालक डॉ. सारिका ताई क्षीरसागर संस्थेचे प्रशासक डॉ. विश्वंभर देशमाने, प्रा. डॉ. सुधाकर गुट्टे, प्रा. डॉ. सिद्धार्थ जाधव, प्राचार्य डॉ. पंडित खाकरे यांनी तिचे अभिनंदन केले आहे. तसेच ▶▶ उर्वरित पान २ वर

# बालस्वरांनी उजळली बालरंगभुमीची दिवाळी पहाट



**बीड । प्रतिनिधी**

बालरंगभुमी परीषद शाखा बीडच्या वतीने शहरातील बालकलावंतासाठी आयोजित केलेली सुरमयी दिवाळी पहाट अत्यंत उत्साहात संपन्न झाली. बालरंगभुमी परिषद मुख्य शाखा मुंबईच्या उपाध्यक्षा तथा बालरंगभुमी परिषद शाखा बीडच्या अध्यक्षा डॉ. दिपाताई क्षीरसागर यांनी एक अभिनव उपक्रम राबवला. दिवाळी पहाट ही बालकलावंताची असावी या कल्पनेतून आज धनत्रयोदशीच्या दिवशी बीड मधील ५० ते ७५ कलावंतानी बालरंगभुमीच्या व्यासपीठावर दिवाळीची गाणी भक्तीगीते, भावगीते सादर केली. याकार्यक्रमाची सुरुवात गार्गी जोशी हीच्या गणेशवंदना या भरतनाटय नृत्याने झाली. यानंतर अंध असूनही दिवाळीचा आनंद व्यक्त करणारे गीत आली माझ्या घरी दिवाळी हे गीत अत्यंत मधुर स्वरात विशाखा वरकटे हिने सादर केले तर अर्णव खडकीकर याने निघालो घेवून दत्ताची पालखी हे गीत सादर केले. यात धुतेकर संगीत विद्यालयाच्या विद्यार्थी तन्वी दहिवाळ, सचिन मार्गे संगीत विद्यालयाचे विद्यार्थी, नरहरी दळे संगीत विद्यालयाचे विद्यार्थी, देव मुळे , वेदांत काजळे, स्वराली साळुंके, देवकी साळुंके, शांभवी राउत, आदीती मेहकर, वैभवी वायकर, तन्वी घिगे, सुहास जाजु, गौरव माने, अनन्या सरवदे, इशा सरवदे या कलावंतानी अप्रतीम अशी श्रवणीय गीते सादर केली. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन बालकलावंत सुरभी निराळे हिने केले. याप्रसंगी सहभागी बालकलावंताना प्रमाणपत्र देण्यात आले. याप्रसंगी दि. १५ ऑक्टोंबर रोजी घेण्यात आलेल्या पणती रंगवणे व गडकिल्ले बनवणे या स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले. याकार्यक्रमाला डॉ. सौ. दिपाताई क्षीरसागर, जेष्ठ गायक भरतअण्णा लोळगे, जेष्ठ पत्रकार महेश वाघमारे, दिपक मुळे, वासुदेव काजळे, सुदर्शन धुतेकर, प्राचार्य शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळाणकर,उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे, यांची उपस्थिती होती.

# काझी सईद रफिउद्दीन यांना महात्मा गांधी राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित



**बीड । प्रतिनिधी**

पुण्यातील आंतरराष्ट्रीय मानवाधिकार राजदूत संघटना आणि सामाजिक कार्य क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत बीड जिल्ह्याचे सुपुत्र काझी सईद रफिउद्दीन यांना महात्मा गांधी राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार डॉ. अविनाश धनंजय सकुंडे (सदस्य सल्लागार समिती, दिल्ली अल्पसंख्याक आयोग) यांच्या हस्ते देण्यात आला. या विशेष समारंभास एनसीटी सरकार दिल्लीचे अध्यक्ष, अखिल भारतीय भ्रष्टाचार विरोधी संसद समितीचे सदस्य, मराठी चित्रपट अभिनेत्री सोनाली कणखरे आणि फाल्गुनी झेंडे हे मान्यवर विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. काझी सईद रफिउद्दीन यांचे अपवादात्मक नेतृत्व, समाजप्रती असलेले निस्सीम समर्पण आणि विविध सामाजिक उपक्रमांमधून दिलेले प्रभावी योगदान याची दखल घेत त्यांना या पुरस्काराने गौरवण्यात आले. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी गौरवोद्गार काढताना म्हटले की, सत्य, सचोटी आणि सेवाभाव यामध्ये काझी सईद रफिउद्दीन यांची वचनबद्धता ही महात्मा गांधी यांच्या कालातीत मूल्यांचे प्रतिबिंब आहे. त्यांच्या कार्यामुळे आज अनेक समुदायांमध्ये सौहार्द, सक्षमीकरण आणि ▶▶ उर्वरित पान २ वर

# आमदार सुरेश धस यांच्या पाठपुराव्यामुळे वनमंत्री गणेश नाईक प्रत्यक्ष हस्तक्षेप

## बिबट्याच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या शेतकऱ्याच्या कुटुंबाला मिळाली शासकीय आर्थिक मदत



**बीड । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील बावी येथे घटलेली दुर्दैवी घटनेमध्ये तरुण शेतकरी स्व. राजेंद्र विश्वनाथ गोल्हार (वय ३९) यांचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाला, त्या कुटुंबासाठी आर्थिक मदत मिळवण्यासाठी आमदार सुरेश धस यांनी वनविभागाकडे पाठपुरावा करून तात्काळ मदत मिळून दिली. या हृदयद्रावक घटनेनंतर आमदार सुरेश धस यांनी तत्काळ वन विभाग व प्रशासनाशी संपर्क साधला आणि निधीअभावी निर्माण झालेल्या अडचणीवर लक्ष केंद्रित करून मा. वनमंत्री श्री. गणेश नाईक साहेबांकडे पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नामुळे कुटुंबासाठी तातडीची मदत मंजूर करण्यात आली. ▶▶ उर्वरित पान २ वर

# पंचायत समितीला कुलूप ठोकण्याचा इशारा देताच महिलांसाठीचे स्वच्छतागृह सुरू




**बीड । प्रतिनिधी**

बीड पंचायत समिती कार्यालयातील महिला कर्मचाऱ्यांसह कार्यालयात येणाऱ्या महिला अभ्यागतांसाठी असलेले स्वच्छतागृह पाणीटंचाई मुळे गेल्या अनेक दिवसांपासून कुलूपबंद अवस्थेत होते. प्रवेशद्वारावर बाहेरील शौचालय वापरावे अशी नोटीस लावण्यात आली होती, जी महिलांसाठी अत्यंत गैरसोयीची आणि असुरक्षिततेची बाब ठरली होती. सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख – बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र राज्य डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी दि.१७ रोजी पालकमंत्री अजितदादा पवार तसेच वरिष्ठ प्रशासनाला लेखी निवेदन देऊन या संदर्भात तीव्र निषेध नोंदविला. त्यांनी म्हटले होते की, ग्रामीण भागातून येणाऱ्या महिलांना बाहेर शौचालय शोधणे ही केवळ गैरसोय नव्हे, तर सुरक्षिततेच्या दृष्टीने चिंताजनक बाब आहे. तसेच ही घटना स्वच्छ भारत मिशन योजनेला हरताळ फासणारी असल्याचा आरोप करत दि.२० ऑक्टोबर रोजी पंचायत समितीला कुलूप ठोकण्याचा इशारा दिला होता. याची तात्काळ दखल घेत गटविकास अधिकारी श्री. अशोक राठोड यांनी स्पष्ट केले की, संबंधित स्वच्छतागृह दुरुस्तीच्या कामामुळे तात्पुरते बंद करण्यात आले होते. पहिल्या मजल्यावरील स्वच्छतागृहाचे काम पूर्ण करून ते पुन्हा सुरू करण्यात आले आहे. तसेच फक्त पुरुषांसाठी अशी नोटीस अनवधानाने न काढल्याची कबुली देत ती हटविण्यात आली असल्याचेही त्यांनी लेखी पत्रकाद्वारे डॉ. ढवळे यांना कळविले आहे.यानंतर ▶▶ उर्वरित पान २ वर

# के.एस.पी विद्यालयामध्ये डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती साजरी

**बीड । प्रतिनिधी**

कर्मयोगिनी सावित्रीबाई फुले विद्यालय) के.एस.पी विद्यालय येथे डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. नंतर ऋषिकेशजी शेळके सर यांनी मुलांना डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या कार्याविषयी मुलांना अवगत करण्यात आले. शाळेतील इयत्ता १ ली ते ८ वी मधील मुलांनी डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या विषयी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून सौ.अंजलीताई शेळके , व शाळेतील शिक्षक शिक्षिकेत्तर कर्मचारी उपस्थितीत होते.